महत्त्वाचे

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

कोल्हापूर : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

कोल्हापूर, ता. २८ : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

# विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २२ जूनपासून

**कोल्हापूर** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्चपासून ठप्प असलेले शिवाजी विद्यापीठाचे कामकाज आता २२ जूनपासून सुरू होणार आहे. १ ते २१ जून या कालावधीत उन्हाळी सुटी राहील, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिली आहे. व्यवस्थापन आणि विद्या परिषद या अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विद्यापीठाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात आणि उन्हाळी सुटीबाबत कार्यवाही केली जाणार आहे. २०१९ -२०२० या शैक्षणिक वर्षामध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभागांमधील शिक्षकांसाठी १ जून ते २१ जूनपर्यंत उन्हाळी सुटी राहणार आहे.

# 'रि-चेक'च्या उत्तरपत्रिका 'लॉक'डाऊन

## विद्यार्थ्यांना निकालाची प्रतीक्षा; कोरोनाच्या जिल्हाबंदीमुळे झालेय कोंडी

लुमाकांत नलवडे : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठ स्तरावरील निकालानंतर 'रि-चेक'साठी आलेल्या उत्तरपत्रिका लॉकडाऊनमुळे विद्यापीठातच आहेत. त्या तपासणीसाठी सांगली आणि सातारा जिल्ह्यात पाठवाव्या लागणार आहेत; मात्र जिल्हा बंदीमुळे तेथे जाणे अशक्य होत आहे. परिणामी निकाल अद्याप प्रतिक्षेत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्रात कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील परीक्षांचे निकाल साधारण फेब्रुवारीमध्ये जाहीर झाले. त्यानंतर पंधरा दिवसांत फोटोकॉपी मागविण्याची मुदत होती. फोटोकॉपी मिळाल्यानंतर तातडीने आठवड्यात उत्तरपत्रिका पुन्हा तपासणीसाठी (रि-चेक) विद्यार्थ्यांनी अर्ज केले. मार्च २२ मार्चनंतर लॉकडाऊन सुरू झाले. दरम्यानच्या काळात काही उत्तरपत्रिकांचे विभाजन झाले होते. कोणत्या कॉलेजमध्ये कोणत्या उत्तर पत्रिका पाठवायच्या, कोणी तपासायच्या याबाबतचे नियोजन झाले होते. काही उत्तर पत्रिका पाठविल्या आहेत.

दरम्यान, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन झाला आणि सांगली जिल्हा रेडझोन मध्ये आला. यामुळे कोल्हापुरातून उत्तरपत्रिका घेऊन सांगली जिल्ह्यात जाणे अशक्य झाले. प्राध्यापक, मॉडरेटर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुळ गावी गेले. यातून उत्तर पत्रिका तपासण्याचा गुंता आणखी वाढला.

मे संपत आला तरीही रि-चेकच्या उत्तरपत्रिका तपासणीच झाली नाही. कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यात उत्तर पत्रिका पाठवून किमान २० कॉलेजवर त्या घेऊन जाव्या लागतात. हे करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाची गाडी दोन्ही जिल्हयात जाणे अपेक्षित आहे. मात्र जिल्हा बंदीमुळे उत्तरपत्रिका घेऊन कर्मचारी जाण्यास तयार नाहीत.

> **लॉकडाऊन ३१ मे रोजी संपल्यानंतर उत्तरपत्रिका संबंधित कॉलेजवर पाठविल्या जातील. तेथून आठ दिवसांत तपासणीचे काम पूर्ण होईल. साधारण दहा जून पर्यंत निकालाची प्रक्रीया पूर्ण केली जाईल. साधारण पंधरा जूनपर्यंत निकाल जाहीर होईल, असे नियोजन आहे.**
>
> **- गजानन पळसे,** परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ

### तपासणीला मर्यादा

अभियांत्रिकी, कायदा शिक्षण, एमबीए, बीएसस्सीच्या उत्तरपत्रिका रिचेकसाठी आल्या आहेत. ही संख्या हजार-दीड हजार आहेत. संबंधित उत्तरपत्रिका संबंधित विद्यार्थ्यांचे शिक्षक, मॉडरेटर असू नयेत याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळेच सर्व उत्तर पत्रिका कोल्हापुरात तपासण्यावर मर्यादा असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग यांना २२ जूनपर्यंत उन्हाळी सुट्टी

कोल्हापूर : विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागांना १ जून ते २२ जून अशी सुट्टी राहणार असल्याचे शिवाजी विद्यापीठाने पत्रकाद्वारे कळवले आहे. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांचे प्रथम सत्र २२ जून अस राहील. प्रथम, द्वितीय व तृतीय सत्रसमाप्तीच्या तारखा नंतर कळवण्यात येतील, असे पत्रात म्हटले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.



# विद्यापीठात आता तासिका तत्त्वावर शिक्षक भरती शक्य

**कोल्हापूर : सचिन टिपकुर्ले**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून आरक्षणाचे निकष प्राप्त न झाल्याने हंगामी पद्धतीने होणारी शिक्षक भरती आता तासिका तत्त्वावर होणार आहे. नवीन शैक्षणिक सत्र केव्हापासून सुरू होणार याबाबत अद्याप कोणतेच निर्देश नसले तरी विद्यापीठ पातळीवर शैक्षणिक वर्षाची सर्वतोपरी तयारी केली जात आहे.

महाविद्यालय व विद्यापीठात नियुक्त असणाऱ्या शिक्षकांपेक्षा जादा शिक्षकांची गरज असते. गेल्या अनेक वर्षांपासून प्राध्यापक भरती बंद आहे. त्यामुळे आहे त्या शिक्षकांवर अध्यापनाचा अतिरिक्त

---

● तासिका तत्त्वावर भरती ही तात्पुरत्या काळासाठी असणार आहे. शासन निर्देश आल्यानंतर हंगामी पद्धतीने विद्यापीठ अधिविभागातील पदे भरली जातील, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

---

ताण नको म्हणून महाविद्यालय व विद्यापीठात अतिरिक्त शिक्षकांची भरती केली जाते. महाविद्यालयात विविध विषयांसाठी तासिका तत्त्वावर प्राध्यापक नियुक्ती होते. नियमित शिक्षकांवरील कामाचा ताण कमी करून काम करणाऱ्या शिक्षकांना वर्षातून एकदा वेतन मिळते.

याउलट विद्यापीठ पातळीवर अतिरिक्त लागणाऱ्या प्राध्यापकांची नियुक्ती हंगामी पद्धतीने केली जाते. यासाठी शासन आदेशाप्रमाणे आरक्षणाचे निकष पाळले जातात. सध्याच्या भरती प्रक्रियेत मराठा समाजालाही आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याने शासनाने अद्याप याचे रोस्टर तयार केलेले नाही. त्यामुळे हंगामी पदे भरताना तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब ध्यानात घेऊन विद्यापीठ स्तरावरही तासिका तत्त्वावर प्राध्यापक भरती करण्याबाबत हालचाली सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठ अधिविभागात प्राध्यापकांची अंदाजे १२५ पदे रिक्त असून ही पदे तासिका तत्त्वावर भरली जाण्याची शक्यता असून व्यवस्थापन परिषदेतही यावर चर्चा झाल्याचे समजते.

लोकमत

# विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २२ जूनपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि. २२ जूनपासून होणार आहे. त्याबाबतची माहिती प्रशासनाने विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिली आहे. सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षामध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभागांमधील शिक्षकांसाठी दि. १ जून ते २१ जूनपर्यंत उन्हाळी सुट्टी राहणार आहे. सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्राचा प्रारंभ दि. २२ जूनपासून होणार आहे. या सत्राची समाप्ती, द्वितीय सत्राची सुरुवात आणि समाप्ती यांच्या तारखा स्वतंत्रपणे जाहीर केल्या जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

Kolhapur Main
Page No. 2 May 29, 2020
Powered by: erelego.com